नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १४/०७/२०२२ (गुरूवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०४ कि.मी. अंतरावरील पिपरीया पेठ शिवार येथे दिनांक ११/०७/२२ चे १८.०० वा. ते १३/०७/२०२२ चे १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— मनीष रघुनाथ धोबळे, वय ४७ वर्ष, रा. काचुरवाही रिपोर्ट दिली की, आमदार जैस्वाल यांचे शेतात जाळी लागुन असलेली १०० लोखंडी एंगल त्या पैकी ३६ लोखंडी एंगल कि. ३०,०००/—रू. चे जाळी अज्ञात आरोपीने काढुन चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार काठे मो.नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

पो.स्टे. नरखेड :— अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मन्नाथखेडीत नरखेड येथे दि. ११/०७/२०२२ चे २१.०० वा. ते दि. १२/०७/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— रोशन प्रभाकर सलामे वय २५ वर्ष, रा. मन्नाथखेडी त.नरखेड जि.नागपुर यांची एमएच—४०/एएस—६७७१ क्रमांकाची ग्रे रंगाची पॅशन प्रो मोटरसायकल हि घराच्या समोर अंगणात उभी ठेवली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची किमती २५,०००/—रू. मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार धनराज भुक्ते मो. क्र. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. कळमेश्वर :— दिनांक १३/०७/२०२२ चे १५:०० वा. चे सुमारास वय ३८ वर्षीय पीडित/फिर्यादी हिला आरोपी नामे— पप्पु शामराव उईके, वय ३८ वर्ष, रा.योगेश भोपसे यांचे शेतात कोहळी ता. कळमेश्वर जि.नागपुर याने तिचा पाठलाग करून हिन्दीत 'मुझे तेरे साथ सम्बंध बनाना है!' असे म्हणून जबरदस्तीने आरोपीने फिर्यादीस खिचत नेवून रत्याचे कडेला खड्यात नेले. यानंतर आरोपीने फिर्यादी सोबत बळजबरीने जबरी संभोग करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ३५४(डी), ३२३, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गेडाम मो.क्र. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

## विनयभंग

**१) पो.स्टे. सावनेर :–** दिनांक १२/०७/२०२२ चे १५.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय २३ वर्ष यांचे पती हे सासु सोबत शेतीच्या कामाकरीता तहसिल कार्यालय कळमेश्वर येथे गेले होते. फिर्यादी व तिची २ महीन्याची मुलगी सोबत घरात होती. त्यादरम्यान आरोपी नामे– राहुल नामदेव लाडे, वय २८ वर्ष, रा. तेलकामठी हा किराणा दुकाणात खर्रा घेण्याकरीता आला होता. तो खर्रा घेवुन आपले घरी न जाता फिर्यादी हि राहत असलेल्या घरी बाजुच्या गल्लीतून आला दारापुढे येवुन फिर्यादीला वहीनी म्हणुन आवाज दिला, ती बाहेर आली असता त्याने आपली पॅन्ट सोडुन अश्लिल कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला. फिर्यादी ही ओरडल्यानंतर तो तेथुन पळुण गेला होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार देवशंकर गुप्ता हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर :–** दिनांक १४/०७/२०२२ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष फिर्यादी हिला आरोपी क्र. १. यश लिलाधर ससानकर, वय २२ वर्ष, रा. कोथुळणा ता. सावनेर याने प्रेम संबध असल्याचे कारणावरुन पीडितेला सावनेर येथे भेटण्याकरीता बोलावून सावनेर येथील लॉजवर प्रेम आहे असे बोलून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपी क्र २. रितेश मधुकर इंगोले, वय ३२ वर्ष, डब्लुसीएल वाघोडा याने पीडित ही अल्पवयीन आहे हे माहीत असतांनाही लॉज संबधी दिलेली नियमांचे उल्लघंन केले. तसेच आरोपी क्र. १ यास सदरचे कृत्य करण्यास उत्प्रेरणा देवून मदत केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४,३५४ अ,१८८ भादवी सहकलम ८, १२, १७ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी रासकर मो.नं. ९०८२१९६०८० या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील लोहारी सावंगा येथे दिनांक ०५/०७/२२ चे १९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– रमेश शामरावजी कालभुते वय ५८ वर्ष रा. लोहारा ता. नरखेड यांचा मुलगा नामे प्रविण रमेश कालभुते (मृतक) वय ३० वर्ष रा. लोहारा ता. नरखेड हा लोहारी सावंगा वरुन लोहारा घरी येत असता त्याला पांडुरेगेश्वर मंदीराचे समोर अज्ञात वाहानाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे व बेदारकारपणे वाहान चालवुन धडक दिली. या अपघातात प्रविण कालभुते हा मरण पावला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार भोजराज झाडे पो.स्टे. जलालखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी सहकलम १३२, १३४, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्री शेन्डे मो.नं. ९६३७५७८७६३ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. देवलापार –** दिनांक १२/०७/२०२२ चे १४.३० वा. ते १५.३० वा. चे सुमारास पो.स्टे. देवलापार हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– शमीम सलिम पठाण, वय ४६ वर्ष, रा. देवलापार याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि लक्ष्मी घोडके मो.क्र. ८८३०६१४९५० या करीत आहे.

**२) पो.स्टे. कोंढाळी –** दिनांक १३/०७/२०२२ चे १८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कोंढाळी हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राठोड मो.क्र. ८८३०६१४९५० या करीत आहे.

**३) पो.स्टे. कळमेश्वर –** अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील ब्राम्हणी फाटा येथे दिनांक ११/०७/२२ चे १०.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– संगीता दिलीप सुर्यवंशी वय ३६ वर्ष रा. ब्राह्मणी फाटा इंदिरानगर झोपडपट्टी हिने आपले मुलाला आयटीआय मध्ये का जात नाही असे रागविले असता तिचा मुलगा साहील हा घरातून बाहेर निघून गेला. बराच वेळ होवून सुध्दा तो घरी परत न आल्याने त्यांच्या शेजारी नातेवाईक, त्याचे मित्र, व ईतर सर्वत्र फोन लावून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष फिर्यादीने मुलाविषयी आजपर्यंत चौकशी केली असता तो मिळून आला नाही. फिर्यादीचा मुलगा साहील दिलीप सुर्यवंशी वय १६ वर्ष रा. ब्राह्मणी फाटा इंदिरानगर झोपडपट्टी याचे अल्पवयाचा व अज्ञातपणाचा फायदा घेवून अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मुलाला फुस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास गेड पोउपनि श्री पाली मो.क्र. ९२८४३५४६३० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**